

# असेही वर्तुळ काढा



वर्तुळ काढण्याचा हा एक वेगळाच प्रकार आहे. एक आयताकृती कागद घ्या. एका पुठ्ठ्यावर 4 सेंटीमीटर अंतरावर दोन टाचण्या लावा. दोन टाचण्यांमध्ये कागदाचा काटकोन अशा तऱ्हेने बसवा, की कागदाच्या दोन बाजू टाचण्यांना टेकतील. काटकोनाच्या जागी पेन्सिलीने एक ठिपका काढा.

कागदाची जागा दरवेळी हलवून एक एक नवा ठिपका काढा.
एका बाजूचे अर्धवर्तुळ पूर्ण झाले, की काटकोनाची दिशा उलटी करा आणि दुसऱ्या बाजूनेही तसेच अर्धवर्तुळ पूर्ण करा.